NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर"

## आस्थापना विभाग

**वाचा :-** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, मंत्रालय, मुंबई, दि. १८ सप्टेंबर, २०२०.

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात दि. ०६/०७/२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांना आव्हान देणाऱ्या तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य सरकार यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याच्या निर्णयास आव्हान देणाऱ्या विविध याचिका मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. सदर याचिकामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८ ऑगस्ट, २०२० रोजी निर्णय दिला असून, त्यानुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या/अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याचे आहे.

सदर परीक्षेच्या कामकाजाकरिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. प्रचलित कार्यपध्दतीनुसार परीक्षा पध्दतीमध्ये अनेक प्रक्रियांचा समावेश असून, त्यामध्ये प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रिका तयार करणे, निकाल घोषित करणे, फेरमूल्यांकन करणे अशी अनेक कामे समाविष्ट आहेत. सदर परीक्षा दि. १ ऑक्टोबर, २०२० ते दि. ३१ ऑक्टोबर, २०२० या कालावधीत घेऊन त्याचा निकाल नोव्हेंबर, २०२० च्या पहिल्या आठवडयात जाहिर करण्याचे आहे. याकरिता मोठया प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता आहे. एकंदरीत कमी कालावधीत परीक्षा पार पाडणे व त्याचा निकाल जाहिर करणे हे आव्हानात्मक काम प्राप्त परिस्थितीत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दि. १९/०९/२०२० पासून कार्यालयात उपस्थित असणे बंधनकारक आहे.

कार्यालयात येतेवेळेस सर्व संबंधितांनी कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये व त्याचा संसर्ग होऊ नये म्हणून राज्य शासनाच्या तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आदेशातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आहे.

आदेशान्वये,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

संदर्भ : पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/२०२०/ 7763
दिनांक : 1 8 SEP 2020

प्रति,

१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
२) मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
३) कुलसचिव यांचे कार्यालय
४) संचालक/विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले
५) विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

सदर परिपत्रक आपल्या संकुलातील/विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.